लक्ष्यवेध

संपादक : निलेश पुराणिक EDITOR- NILESH PURANIK Email Id- beedlakshyavedh@gmail.com

●वर्ष-३ ले ●अंक ४८ ●मंगळवार दि. ३ नोव्हेंबर २०२६ ●पाने ४ ●पोस्टल नंबर- L SB/Beed/RNP-255/2025-2027 ●आरएनआय नं.- MAHMAR/2023/89380 मुल्य २ रुपये

●Year-3 ●Paper- 48 ● Tuesday 3 November 2026 ●Page-4 ● Postal No. :- L SB/Beed/RNP-255/2025-2027 ● RNI :- MAHMAR/2023/89380 ● Price- 2 Rs.

ना पिण्याचे शुद्ध पाणी, ना स्वच्छतागृह, ना स्वच्छ जागा; कर वसूल करण्यात नगरपालिका तत्पर, सुविधा देताना मात्र हात आखडता!

भाजीविक्रेत्यांकडून रोज 10 रुपये वसुली; मग सुविधांच्या नावाने नगरपालिकेचा ठणठणाट का?

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपालिकेच्या विकासाच्या दाव्यांची शहरातील भाजी मंडईची अवस्था पोलखोल करत आहे. भाजीविक्रेत्यांकडून दररोज बसण्याचे १० रुपये घेतले जातात; मात्र त्या बदल्यात त्यांना साध्या मूलभूत सुविधाही उपलब्ध करून दिल्या जात नाहीत. ना पिण्यासाठी शुद्ध पाणी, ना महिला व पुरुषांसाठी स्वच्छतागृह, ना बसण्यासाठी स्वच्छ जागा! रस्त्यावर अस्वच्छ वातावरणात बसून भाजी विकण्याची वेळ विक्रेत्यांवर आली आहे. मग दररोज पैसे वसूल करणारी बीड नगरपालिका नेमका कोणत्या सुविधांचा मोबदला घेते? असा संतप्त सवाल भाजीविक्रेते आणि नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.शहरातील भाजी मंडईचा प्रश्न अनेक वर्षांपासून ऐरणीवर आहे. भाजी विक्रेत्यांना व्यवस्थित जागा, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह आणि स्वच्छ परिसर मिळणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात परिस्थिती मात्र याच्या अगदी उलट आहे. दररोज भाजी विक्रीसाठी येणाऱ्या विक्रेत्यांना अस्वच्छ जागेत बसावे लागते. ग्राहकांनाही याच अस्वच्छतेचा सामना करावा लागतो. भाजी खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांची गर्दी, वाहनांची वर्दळ आणि पार्किंगचा अभाव यामुळे परिसरातील गैरसोय आणखी वाढत आहे. मात्र या प्रश्नाकडे नगरपालिका प्रशासनाचे लक्ष कधी जाणार, हा खरा प्रश्न आहे.



सिद्धिविनायक संकुलाचे घोडे अडले कुठे?

गेल्या अनेक वर्षांपासून बीड नगरपालिकेकडून भाजी मंडई सिद्धिविनायक संकुलात स्थलांतरित करण्याच्या हालचाली सुरू असल्याचे सांगितले जाते. मात्र प्रत्यक्षात हा निर्णय कागदावरच अडकून पडला आहे. सिद्धिविनायक संकुलाची योग्य स्वच्छता करून, आवश्यक दुरुस्ती करून आणि दोन-चार वेळा पाण्याने स्वच्छ धुलाई करून तेथे भाजी मंडई सुरू करता येऊ शकते. यामुळे भाजीविक्रेत्यांना व्यवस्थित जागा मिळेल, नागरिकांची गैरसोय कमी होईल आणि पार्किंगचा प्रश्नही मोठ्या प्रमाणात मार्गी लागू शकेल. मग या स्थलांतराच्या निर्णयाचे घोडे नेमके अडले कुठे? हा निर्णय अडवतोय कोण? की प्रशासनाला हा प्रश्न सोडवण्यात स्वारस्यच नाही? असे सवाल उपस्थित होत आहेत.

विरोधकांनी आवाज उठवण्याची गरज

बीड नगरपालिकेत सध्या भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) हे विरोधी बाकावर आहेत. विरोधकांनी केवळ सत्ताधाऱ्यांवर टीका करण्यापुरते मर्यादित न राहता शहरातील या ज्वलंत प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. भाजीविक्रेत्यांकडून दररोज पैसे घेतले जात असताना त्यांना मूलभूत सुविधा का मिळत नाहीत, याचा जाब नगरपालिकेला विचारला पाहिजे. सिद्धिविनायक संकुलातील मंडई स्थलांतराचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी विरोधकांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

नगरपालिका कर आणि शुल्क वसूल करण्यात तत्पर असेल, तर नागरिकांना आणि व्यावसायिकांना आवश्यक सुविधा देण्याची जबाबदारीही तितक्याच तत्परतेने पार पाडली पाहिजे. रोज दहा रुपये घेऊनही भाजीविक्रेत्यांना पिण्याचे पाणी आणि स्वच्छतागृह मिळत नसेल, तर नगरपालिकेच्या विकासाच्या दाव्यांचा उपयोग काय? आता तरी प्रशासनाने जागे व्हावे, सिद्धिविनायक संकुलातील मंडई स्थलांतराचा प्रश्न निकाली काढावा आणि भाजीविक्रेत्यांना सन्मानाने व्यवसाय करता येईल, अशा सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

वैभव पाटील साहेब, पुन्हा एकदा मैदानात उतरा अतिक्रमणधारकांनी पुन्हा डोके वर काढले!

नगर रोडवर फळविक्रेत्यांचा कब्जा, सुभाष रोडवर रस्त्याच्या मधोमध वाहनांचे पार्किंग

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील वाहतूक कोंडी आणि अतिक्रमणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी काही महिन्यांपूर्वी केलेल्या धडक कारवाया आणि अनोख्या जनजागृती मोहिमेची शहरात चांगलीच चर्चा झाली होती. सुभाष रोडवरील व्यापाऱ्यांना शिस्त लावण्यापासून नगर रोडवरील फळविक्रेत्यांना आणि जालना रोडवरील बेशिस्त रिक्षाचालकांना फुल देऊन समजावण्यापर्यंत त्यांनी वेगवेगळे प्रयोग केले. त्यांच्या या पुढाकारामुळे अतिक्रमणधारकांमध्ये कारवाईचा धाक निर्माण झाला होता. मात्र, आता पुन्हा एकदा परिस्थिती बदलू लागली आहे. पोलिसांचे लक्ष दुसरीकडे वळताच अतिक्रमणधारकांनी पुन्हा रस्त्यांवर कब्जा करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे वैभव पाटील साहेब, आपण केलेल्या कामावर पाणी फिरू देऊ नका, पुन्हा एकदा सक्रिय व्हा, अशी अपेक्षा नागरिकांतून व्यक्त होत आहे.




बीड शहरातील नगर रोडवर अतिक्रमणाचा प्रश्न पुन्हा गंभीर बनत चालला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याकडून पुढे जाताना डाव्या बाजूला फळविक्रेत्यांनी मोठ्या प्रमाणात जागा व्यापल्याचे चित्र दिसत आहे. रस्त्याच्या कडेला व्यवसाय करण्याऐवजी विक्रीसाठीचे साहित्य, फळांच्या गाड्या आणि इतर सामान रस्त्याच्या वापराच्या जागेत येत असल्याने पादचाऱ्यांना चालण्यासाठीही पुरेशी जागा उरलेली नाही. नागरिकांना रस्त्यावरून मार्ग काढताना कसरत करावी लागत आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांना तर या अतिक्रमणाचा विशेष त्रास सहन करावा लागत आहे. फळविक्रेत्यांचा व्यवसाय महत्त्वाचा असला तरी त्यासाठी सार्वजनिक रस्ताच व्यापला जाणार असेल, तर पादचाऱ्यांनी चालायचे कुठून? हा प्रश्न अनुत्तरित आहे.

सुभाष रोड परिसरातही अतिक्रमण आणि पार्किंगचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. यापूर्वी पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी या भागातील व्यापाऱ्यांना आणि वाहनधारकांना शिस्त लावण्यासाठी विशेष प्रयत्न केले होते. रस्त्यावरील अडथळे दूर करण्यासाठी त्यांनी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून कारवाईचा बडगा उगारला होता. मात्र, आता पुन्हा मोठ्या व्यापाऱ्यांकडे येणारे काही ग्राहक आपली वाहने रस्त्याच्या मधोमध उभी करत असल्याचे चित्र दिसत आहे. परिणामी, वाहतुकीचा वेग मंदावतो, वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात आणि इतर वाहनधारकांना मार्ग काढणे कठीण होते. व्यापाऱ्यांचा व्यवसाय आणि ग्राहकांची सोय महत्त्वाची असली तरी त्यासाठी सार्वजनिक रस्ता पार्किंगची जागा बनवणे योग्य कसे?

जालना रोडवरील बेशिस्त रिक्षाचालकांना शिस्त लावण्यासाठीही वाहतूक शाखेने यापूर्वी पुढाकार घेतला

◀◀ पान २ वर

सारडा परिवाराकडून मराठी भाविकांसाठी तिरुपतीमध्ये साकारणार भक्तनिवास



बीड । प्रतिनिधी

सहकार आणि शिक्षण क्षेत्रात गेल्या ५० वर्षांहून अधिक काळ आपल्या विश्वासाने आणि कर्तृत्वाने एक वेगळा ठसा उमटवणारे ज्येष्ठ समाजसेवक सुभाषचंद्र सारडा यांच्या संकल्पनेतून तिरुपती बालाजी येथे मराठी भाविकांसाठी एक भव्य 'भक्तनिवास' साकारत आहे. जागतिक दर्जाच्या या आध्यात्मिक राजधानीत बीडमधील एका मराठी परिवाराने हे पाऊल उचलल्यामुळे संपूर्ण जिल्ह्यातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. याच ऐतिहासिक घोषणा आणि लोकोपयोगी कार्याचे औचित्य साधून आज बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने डॉक्टर आदित्य सुभाषचंद्र सारडा यांचा सत्कार करण्यात आला.

या भक्तनिवासासाठी तिरुपती येथे नुकतीच जागा खरेदीची प्रक्रिया पूर्ण झाली असून, लवकरच या भव्य वास्तूचे बांधकाम सुरू होणार असल्याची माहिती डॉ. आदित्य सारडा यांनी दिली होती. सारडा परिवाराच्या या सामाजिक बांधिलकीचे आणि देवकार्याचे कौतुक करण्यासाठी आयोजित या सत्कार सोहळ्याला भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस सलीम जहाँगीर आणि भाजपचे बीड जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी भाजपा जिल्हा सचिव शांतीनाथ डोरले, अनिलजी चादने , भाजपचे घोडके सर, सुशील जाधव, महादेव नागरगोजे, विलास बामणे, केशव वडे, सिद्धेश्वर क्षीरसागर, रोहिदास लांडे, आप्पासाहेब लांडे, दिनकर लांडे, रमेश शिंदे, काशीनाथ लांडे, गणेश बाप्पा लांडे आणि जनार्दन लांडे ,जनार्दन लांडे .यांच्यासह जिल्हा भाजप पदाधिकारी तसेच बरणपूर गावचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत हा सत्कार करण्यात आला.सत्काराला उत्तर देताना डॉक्टर आदित्य सारडा म्हणाले की, तिरुपती येथील भक्तनिवासाचे काम येणाऱ्या काळात लवकरात लवकर काम पूर्ण करण्याचा आमचा मानस आहे. मराठी भाविकांची तिथे उत्तम सोय व्हावी यासाठी आमचा परिवार कटिबद्ध असून, यापुढेही समाजाच्या प्रगतीसाठी आणि लोकहिताचे काम आम्ही अविरतपणे करत राहू, अशी ग्वाही त्यांनी याप्रसंगी दिली. तिरुपती सारख्या पवित्र ठिकाणी मराठी माणसाच्या हक्काची सोय उपलब्ध करून दिल्याबद्दल संपूर्ण सारडा परिवाराचे आभार मानत पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.